# Heritage Collective

Dr. Rajeshri Gokhale
Dr. Anagha Kale
Vrushali Mahajan

The student and teacher group called heritage collective is initiated with the idea of helping our students rediscover our great civilization and feel proud of being citizens of our great motherland INDIA.

A number of activities were conducted this year which not just fulfilled the objective of the association but also developed various skill and managerial qualities in the group

1. World Music day wherein the importance of Music as a means of unifying all, was emphasized
2. Participation of some students and faculty in the workshop on Heritage and Good Citizenship organized by INTACH.
2. Astitva the intercollegiate event celebrating Indian Heritage which witnessed participation of more than 1000 students from more than 50 colleges. The chief guest was Shri. Subodh Bhave and the different events were judged by renowned judges like Prashant Naseri, Tejas Modak, Milind Dhere, Prajakta Atre, and many more
3. Makar Sankrant Celebrations were the tradition of distributing Tilgul and bonding with the seniors visiting our campus for their morning and evening walks
4. Celebration of International Mother Language Day in association with PNG Language Lab
5. The students of heritage collective visited Matoshri Old age home and spent time with the elders. They also donated 12 chairs to the institution from the money raised by sale of paintings and cards of ASTITVA participants. Swarishkar, a cultural program was planned as well for the seniors in association with Anadi Ek Vichar

This year being the platinum year of BMCC, three special events were organized by the association

1. Virasaat Interaction with our own alumni and noted classical singer Rahul Deshpande who shared his experiences and the importance of our Indian Classical Music. He also urged the students to abstain from all addictions.
2. A photography event" BMCC through my Lens" where students captured the essence of BMCC The event received a huge response with students capturing our heritage building, the infrastructure like classrooms, library, the beautiful environs of BMCC and most importantly the rich biodiversity in BMCC. It was judged by noted photographer Satish Paknikar. Akash Khedkar won the first prize for the same.
3. Visit to the Diamond Factory in Seepz Mumbai to understand the importance of the role of this industry in the exports of India with the kind support and patronage of our alumni Dr. Vikram Mehta

The Members also participated in the Rally organized to celebrate the Platinum Jubliee. Some of the students also visited several forts like Shivneri, Rajgad, Harishchandragad on their own initiative.

We are thankful to all involved in these activities and all the active volunteers of the association. Special mention to Neeraj, Raghav, Siddharth, Soham, Mitali, Avinash, Pooja, Siddhi, Muskaan, Deshna, Kirti,Vaishnavi, Gargi, Komal for their active contribution for all activities

# सांस्कृतिक विभाग

डॉ. आशिष पुराणिक



बृहन्ममहाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे यंदाचे वर्ष २०१७-१८ हे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि यशस्वी ठरले आहे. ह्या वर्षी विभागातील सर्व कलाकरांनी मिळून खूप मोठ्या प्रमाणात यश मिळवले आहे. यंदा नाटक, नृत्य आणि संगीत या तिन्ही विभागांना मिळून १७ सांघिक करंडक व ५० वैयक्तिक पारितोषिके मिळाली आहेत.

यंदाची ''नेम्मारा शंकरनकुट्टी'' आणि 'कॅप्टन' ही नाट्यवाचन 'Sorry परांजपे' ही पुरुषोत्तमची एकांकीका आणि 'इतिहास गवाह है...?' ही पिरोदीयाची एकांकीका, 'ए ७ लरपव' हा ाळील सीर्ीचि लरपव आणि 'ऊपलळपस ऊर्ळीीं' हा वरपलश सीर्ीि हि पित्ती हॉलचे/सांस्कृतिक विभागाचे महत्त्वाचे Production.

ह्या सांस्कृतिक वर्षाची सुरुवात ही अभिनेता व संस्कृती दिग्दर्शक 'गिरीश कुलकर्णी' यांच्या हस्ते झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना चांगला सल्ला देऊन त्यांचं मार्गदर्शन केल.

वर्षाची पहिली स्पर्धा म्हणजेच 'सिंबायोसिसचा सुमन करंडक' या स्पर्धेत दिप्ती कचरे, आदित्य पवार दिग्दर्शित व दिप्ती कचरे लिखित 'नेम्मारा शंकरनकुट्टी' या गंधर्व गुळवेलकर व शुभम गिजे लिखित, दिग्दर्शित 'कॅप्टन' ही दोन्ही नाट्यवाचन अंतिम फेरीत दाखल झाली व 'नेम्मारा शंकरनकुट्टी' या नाट्यवाचनाला तिसरा सांघिक करंडक मिळाला या चिन्मय देव याला सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनयाचा पुरस्कार मिळाला.

ह्या वर्षाची सर्वात यशस्वी आणि लोकप्रिय ठरलेली एकांकिका म्हणजे 'सॉरी परांजपे' ह्या एकांकिकेला 'पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत 'संजीव करंडक' हा तृतीय सांघिक करंडक मिळाला असून ऋषी मनोहर याला 'गणपतराव बोडस पारितोषिक - सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन' व गंधर्व गुळवेलकर याला सर्वोत्कृष्ट अभिनयाचे 'निर्मल पारितोषिक' हे मिळाले. 'सॉरी परांजपे' या एकांकीकेचे महाराष्ट्रभरात ८ वेगवेगळ्या शहरांमध्ये ३२ प्रयोग झाले असून ही एकांकीका महाराष्ट्राची = 'लोकांकिका' ठरलेली आहे. 'लोकसत्ता आयोजित लोकांकिका स्पर्धेत 'सॉरी परांजपे' ही प्रथम स्थानी आलेली आह. 'सॉरी परांजपे' ला अभिनय महाकरंडक (नेरुळ), अक्षर करंडक (नगर) या स्पर्धांमध्ये सांघिक प्रथम करंडक मिळाले आहेत. 'सवाई एकांकीका स्पर्धेत' 'सॉरी परांजपे' या एकांकीकेला सांघिक द्वितीय हे पारितोषिक मिळाले आहे. 'भरत करंडक', 'रोटरी करंडक' आणि 'वोडाफोन रंगसंगीत' या स्पर्धेतही ह्या एकांकीकेला द्वितीय करंडक आहेत. या एकाकीकेसाठी ऋषी मनोहर याला दिग्दर्शनाचे व अभिनयाचे, चिन्मय देव याला लेखनाचे व अभिनयाचे व गंधर्व गुळवेलकर व आदित्य पवार यांना अभिनयाचे वैयक्तिक पारितोषिके मिळाली आहेत.

या वर्षी सांस्कृतिक विभागाने महाविद्यालयाला ७५ वर्षेपूर्ण झाल्याच्या संधीचा फायदा घेऊन 'महोत्सव' हा कार्यक्रम २७ व २८ नोव्हेंबर रोजी सादर केला. या महोत्सवात माजी विद्यार्थी यांच्यासोबत नवीन विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी मिळाली. २७ रोजी 'एर्पीळीळेप' हा नृत्य व गाण्याचा कार्यक्रम सादर झाला व २८ तारखेला 'सॉरी परांजपे' व मागच्या वर्षाची 'आवेरे हिचकी' या दोन एकांकीका सादर झाल्या.

प्रसंगनाट्य स्पर्धा म्हणजेच 'सरपोतदार करंडक' ही प्रसंगनाट्यस्पर्धा या वर्षी देखील पार पडली. यंदा परीक्षक म्हणून अभिनेता

सागर देशमुख व अभिनेत्री अश्विनी गिरी हे उपस्थित होते. ह्या वर्षीचा 'सरपोतदार करंडक' सांघिक प्रथम हा सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळाला व दुसर पारितोषिक फर्ग्युसन महाविद्यालयाला मिळालं.

यंदाच्या फिरोदीयाच्या एकांकीकेने 'इतिहास गवाह है...?' ने इतिहास घडवला. २८ वर्षांनी बृहन्ममहाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाला पहिला फिरोदिया करंडक मिळाला आहे. या सोबतच ऋषी मनोहर याला 'सर्वोत्कृष्ट चिन्मय देव, शुभम गिजे यांना सर्वोत्कृष्ट लेखक, तुषार देशपांडे याला सर्वोत्कृष्ट गायक ऋषी मनोहर, चिन्मय देव यांना अभिनयाचे पारितोषिक पण मिळाले आहे. या उपर सर्वोत्कृष्ट वाद्यवृंदासाठी द्वितीय पारितोषिक हे बृहन्ममहाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाला मिळाले. या व्यतिरिक्त सागर डहाळे याला bass guitar वादनासाठी व गौरी दिवाण, गंधर्व गुळवेलकर यांना विशेष नृत्यप्रकारासाठी पारितोषिक मिळालं. अभियांत्रिकी महाविद्यालयांची मक्तेदारी असलेल्या 'फिरोदिया करंडक' या स्पर्धेमध्ये अनेक वर्षांनी एका वाणिज्य महाविद्यालयाने बाजी मारली आहे.

नाट्य विभागाप्रमाणे या वर्षी संगीत विभागाचे योगदान देखील लक्षणीय ठरले आहे. पित्ती हॉल घ्या 'ए ७' या चळीळल लरपव ने विविध स्पर्धामध्ये भाग घेऊन पारितोषिके मिळविली आहेत. 'सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट', खडकी, आयोजित 'Orions' या स्पर्धेत ए७ ने प्रथम बक्षीस पटकावले तसेच 'एम.आय.टी. - आरोहन' व 'सिंपल्स' या स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक मिळाले आहे.

या वर्षीचा संगीत विभागाचा प्रमुख तुषार देशपांडे याने ए७ band सुरू केला. ए७ लरपव ने आय.आय.टी. पवई आयोजित चेव खपवळसे या स्पर्धेमध्येही भाग घेतला होता.

या वर्षी 'dancing Divas' नावाच्या ऊपलश ग्रुपची निर्मिती डान्स हेड मधुरा गोकर्ण हिच्या नेतृत्वाखाली झाली. या ग्रुपने देखील चेव खपवळसे या स्पर्धेत भाग घेतला होता. त्यांना NIEM या संस्थेने आयोजिलेल्या स्पर्धेत व Ness थरवळर आयोजित INFINITY या स्पर्धेत प्रथज्ञ पारितोषिक प्राप्त केले. तसेच 'प्रवरा' या स्पर्धेत या ग्रुपला तृतीय बक्षीस मिळाले.

यंदा बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने नाटक, संगीत व नृत्य या तिन्ही आघाड्यांवर मोलाची कामगिरी दर्शविली आहे. फिरोदिया करंडक ही ह्या वर्षीची शेवटची स्पर्धा असून हे सांस्कृतिक वर्ष खूप उत्साहाचं व यशाने भरलेलं पूर्ण पडलं आहे.

**Next Year Vendor :**

नाट्य - गंधर्व गुळवेलकर
संगीत - सागर डहाळे
नृत्य - आरोही वकील
आर्थिक विषय - सोनाली अभिषेक
सांस्कृतिक प्रमुख - शुभम गिजे

**सरस्वती प्रसाद पारितोषिक :**

ऋषी मनोहर
आशिष पवार
तुषार देशपांडे
चिन्मय देव

---

If I have done the public any service, it is due to patient thought.

**-Sir Issac Newton, remark to Dr. Bentley**

# Swaravishkar 2018

**Raghav Naphade**
**Anup Shaha**
**Amey Limaye**

Swaravishkar, this year was celebrated in a very unique way which helped us serve a larger purpose complimentary to spreading classical music and fine arts. The concert was held at Matoshri, Old Age Home near Rajaram Bridge, Pune with the purpose of bringing smile on the faces of the elders there, through music and fine arts. The concert took place on 31st January, 2018 and it was the 2nd concert held by Heritage Collective, Brihan Maharashtra College of Commerce in association with Anaadi…Ek Vichar and supported by Paras Group. The initial one was held at Cyrus Poonawala Hall in BMCC itself on 26th January 2017.

The program commenced with the students of Heritage Collective, BMCC donating chairs to Matoshri, which were purchased from the funds collected by selling artefacts of the competitors collected during Astitva. Dr. Rajeshree Gokhale deliverd an introductory note which was followed byaddress by Mr. Deshpande, manager at Matoshri. The concert then began with Chaitra Godbole who performed Ganesh Vandana (Kathak) which was then followed by vocal performance by Mitali Yarde. A santoor recital by Shantanu provided the soothing touch of music. Classical dances were also perfomed by Muskan Thange, Gargi Virkud and Anushka Kumbhar and a calm Bhairavi by Mitali concluded the concert. Raghav Naphade and Abhishek Pawar graced the vocal performances as they accompanied them with Harmonium and Tabla respectively. Vaibhav Joshi shouldered the responsibility of being Master of Ceremony. Prof .Vrushali Mahajan concluded the program and Shraddha Ponkshe delivered the Vote of Thanks.

Happy faces of everyone present there endorsed the success of the program and all this was only possible due to the guidance and support by our Principal Dr. Chandrakant Rawal, Heritage Collective Faculty members Dr. Rajeshree Gokhale, Dr.Anagha Kale, Prof. Vrushali Mahajan, Astitva Team and all the members of Anaadi… EkVichar.

It wouldn't be wrong in saying that:

"Music is the food for the soul and can ease any pain"

Let's spread the classical music and fine arts to every nook and corner and make living a more beautiful experience.

# अस्तित्व २०१७

डॉ. राजेश्री गोखले

अस्तित्व अगदी नावाप्रमाणेच भारतीय संस्कृतिचा वारसा जपणारा एक आगळावेगळा सोहळा, तरुणाईला आपल्या संस्कृतीशी जोडण्याचा एक निख्खळ प्रयत्न बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने हेरिटेज कलेक्टीव विभागांतर्गत गेल्या आठ वर्षापासून सुरू केला आहे. महाविद्यालयाच्या ७५व्या वर्धापन वर्षी अस्तित्वाने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या रुपाने जणू गौरव ध्वज रोवला.

२२ ऑगस्ट २०१७ मंगवार रोजी या समारंभाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध दिग्दर्शक अभिनेते श्री. सुबोध भावे उपस्थित होते. दिपप्रज्वलनाचा कार्यक्रम मा. श्री. सुबोध भावे, मा. प्राचार्य डॉ. चंद्रकांत रावळ, प्राध्यापिका डॉ. राजेश्री गोखले, डॉ. अनघा काळे, सौ. वृषाली महाजन, प्राध्यापक श्री. प्रसाद बर्वेआणि विद्यार्थीप्रतिनीधी चि. नीरज पवार यांच्या हस्ते संपन्न झाला. दिपप्रज्वलनाच्या वेळी सभागृहात उपप्राचार्य, रजिस्टार, इतर प्रशासकीय वर्गासोबत शेकडो प्रेक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमावेळी श्री. भावे यांनी आपले अस्तित्वबद्दलचे मत प्रेक्षकांसमोर मांडले, त्यासोबत त्यांच्या महाविद्यालयीन कार्यकाळाबद्दलही थोडक्यात भावना मांडून टिळकांच्या सिंहगर्जनेने भाषणाचा शेवट केला.

अस्तित्वाचे अस्तित्व टिकविण्यासाठी पुढे आलेले प्रायोजक, दरोडे जोग प्रॉपर्टीज, फ्लीटगार्ड-फिलट्रम, रानडे ग्रुप, हेरिटेज इंडिया, वाडेश्वर, म्युझिक कॅफे आणि ध्वनियंत्रणा श्री. नाईक यांचा सत्कार मा. प्राचार्य आणि उपप्राचार्यांच्या हस्ते झाला. विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळावा, मनोबल वाढीस प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने अस्तित्व २०१७ मध्ये गायन, नृत्य, चित्रकला, रेखाटन अशा एकूण १० स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्या पुढील प्रमाणे -

१) **स्वरालंकार :** गायक संगितकार मदन मोहन कोहली यांना आदरांजली म्हणून अस्तित्व २०१७ मध्ये गायन म्हणजेच स्वरालंकार या स्पर्धेत रचना मदन मोहनजींच्या ही थीम ठेवण्यात आली होती. स्पर्धकांचे मुल्यांकन प्रसिद्ध गायक श्री. प्रशांत नासेरी यांनी केले. परिक्षकानी स्पर्धकांना मौल्यवान मार्गदर्शनही केले. स्वरालंकार स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी समृद्धी प्रभुणे, सिद्धी देशमुख आणि सहकाऱ्यांनी मिळून घेतली.

२) **नृत्यालंकार :** शास्त्रीय नृत्य आणि लोकनृत्य या थीमवर आधारित या स्पर्धेचे परिक्षण सौ. प्राजक्ता अत्रे, सौ. मनिषा अभय यांनी केले. एकेरी आणि सांघिक अशा गटांत स्पर्धेचे विभाजन करण्यात आले होते. स्पर्धा सुरळीत पार पाडण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांकडे होती. तांत्रिक गोष्टी हाताळण्यासाठी सोहम खटके आणि ऐश्वर्या घरमाळकर सोबत ऐश्वर्या पैठणकर यांनी मेहनत घेतली.

३) **शब्दालंकार :** १८ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत बॉलीवुड आणि पर्यटन, अंडरस्टॅंडिंग इंडिया थ्रू फॉरेन लेन्सेन, आणि आधुनिक शहरात वारसाची भूमिका या विषयांवर मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांत निबंध स्पर्धकांनी लिहिले. स्पर्धेचे परिक्षण करण्याची जबाबदारी सौ. मैत्रेयी शिरोळकर आणि प्रा. प्रतिमा अग्निहोत्री यांनी केले. स्पर्धेचे नियोजन रिद्धी फुळणे, धनश्री गावडे, आणि सहकारी यांनी केले.

४) **क्लीकॅथॉन :** प्रकाशझोत आणि भारतातील पक्षी या विषयांवर स्पर्धकांनी छायाचित्रे काढली. स्पर्धेच्या २ दिवस आधी हे छायाचित्रे महाविद्यालयात आणि ई-मेलवर जमा करण्यात आली. मिलिंद ढेरे यांनी स्पर्धेचे परिक्षण केले आणि सोबतच महत्त्वपूर्ण मार्गदर्शनही दिले. सोहम सहमते, स्वराज कांबळे आणि सहकारी यांनी मिळून या स्पर्धेचे नियोजन केले.

५) **कोलाजकारी :** प्रादेशिक दर्शन या विषयावर स्पर्धकांनी कोलाज बनवून आणले. २२ ऑगस्ट रोजी या कोलाजला प्रदर्शनात ठेवण्यात आले. सौमित्र थिटे, कौशल ब्रह्मा आणि सहकाऱ्यांनी ह्यासाठी मदत केली. स्पर्धेचे परिक्षण श्री. नचिकेत दामले यांनी केले.

६) **डुडल डूस :** गुगलच्या संकल्पनेवर आधारित मेक इन इंडिया आणि स्वच्छ भारत ह्या विषयांवर स्पर्धकांनी डुडलस काढले. शगुनी शाह आणि प्रणव प्रभुमिराशी यांनी सहकाऱ्यांसमवेत ही स्पर्धा पार पाडली. स्पर्धेचे परिक्षण श्री. तेजस मोडक यांनी केले.

७) **रेखाटन :** स्पर्धकांनी आपल्या कलेद्वारे झलक पुण्याची या विषयावर अप्रतिम चित्र रेखाटले. तेजस मोडक यांनी स्पर्धेचे परिक्षण करून स्पर्धकांना मार्गदर्शन केले. सिद्धी खांडे, अमित वाळवेकर आणि सहकाऱ्यांनी स्पर्धेचे नियोजन पाहिले.

८) **रंगानुभव :** आकाशगंगा आणि निसर्ग यातील विषयावर स्पर्धकांनी स्पर्धेच्या दोन दिवस आधी आपली रंगातून मांडून महाविद्यालयात जमा केली. हर्षदा पवार निसर्ग हजारे आणि सहकाऱ्यांनी मिळून या चित्रांचे प्रदर्शन भरविले. चित्रांचे परिक्षण श्री. नचिकेत दामले यांनी केले.

९) **हस्तरंग :** मनस्वी अग्नितकर, स्नेहा भंडारी आणि सहकाऱ्यांनी मिळून स्पर्धेचे आयोजन केले. स्पर्धकांनी महाविद्यालयात येऊन स्वत:च्या किंवा साथिदाराच्या हातावर मेहेंदी काढली. स्पर्धेचे परिक्षण सौ. गितांजली अनेचा ह्यांनी केले.

१०) **अंदमान एक खोज :** कलेसोबत बुद्धीमत्ताही जोपासली पाहिजे. म्हणून अंदमान या बेटाशी निगडीत प्रश्नमंजुषा अस्तित्व २०१७ मध्ये घेण्यात आली. ७०% प्रश्नावली अंदमानवर आणि भारतीय वारस्यावर ३०% असे स्वरुप प्रश्नमंजुशेचे होते. देविशा सुडेकर आणि रिया जैन सोबत सहाकाऱ्यांनी मिळून प्रश्नमंजुषा सांभाळली. पर्यायी परिक्षा आणि त्यानंतर ऑडिओ व्हिजुअल फेरीतून विजेता संघ घोषित केला.

या स्पर्धासोबतच विद्यार्थ्यांमधील व्यावहारिक गुण वाढीस आणण्यासाठी खाऊगल्लीही होती. विविध प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉल्स महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लावले होते. त्यासोबतच निवांत ह्या अंधमुलांच्या संस्थेतील मुलांनी स्वत: बनवलेल्या चॉकलेटस्‌चे स्टॉल्स ही ह्या ठिकाणी ठेवण्यात आले होते.अस्तित्व बांधणीचे काम स्पर्धेच्या दोन महिने आधी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मिळून सुरू केले. नुसत्या स्पर्धांनी अस्तित्व होत नसते, तर ह्या सोहळ्याचे दृश्यमान रुप हेही तेवढेच महत्वाचे असते. ह्यासाठी सिद्धी पवार, नागेश, वैदेही आणि सहकारी यांच्या मदतीने कार्य केले. महाविद्यालयाला उत्कृष्ठरित्या सजविण्याचे काम ह्या सहकाऱ्यांनी केले.

अस्तित्वाची रुपरेषा ठरली. वेळ आली ती अस्तित्वला जागोजागी पोहचवण्याची ही जबाबदारी घेतली समर्थ बालगुडे, आर्या ठाकूर, आदिती नायळ आणि सहकाऱ्यांनी. यात अस्तित्वने एक विक्रमी उच्चांक गाठला. तब्बल १३०० स्पर्धकांनी स्पर्धेसाठी नाव नोंदणी केली.

अस्तित्वचे प्रशासन सुरळीत चालावे ह्यासाठी शिक्षकवृंद आणि नीरजला अनघा गाडे, सोहम आणि तब्बल १३० सहकाऱ्यां मदत केली. अस्तित्वचे अस्तित्व, ह्या परिवारामुळेच मदत केली. अस्तित्वचे अस्तित्व ह्या परिवारामुळेच आजवर टिकले आणि फुलत राहिले. 'अस्तित्व २०१७' ला स्पर्धकांनी आणि त्याचबरोबर प्रेक्षकांनी अप्रतिम प्रतिसाद दिला. शुन्यातून परिपक्वतेकडे आयोजकांसोबत शिक्षक वरिष्ठविद्यार्थी, माजी विद्यार्थी जसे अथर्व परचुरे, गौतमी खाबीया, वैष्णवी देशपांडे, यशश्री सूर्यवंशी यांच्या अनुभवांचा उपयोग झाला.

७ वाजल्यापासून सुरू झालेल्या ह्या नयनदीप सोहळ्याची सांगता विद्यार्थी प्रतिनिधीच्या आभारप्रदर्शनाने झाली.

सर्वांच्या परिश्रमाचे फलित अस्तित्वच्या यशात दिसून आले.